जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक -५०२ दिनांक - २८/११/२०२४

अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंध कक्ष,गुन्हे शाखा पुणे शहर

**राज्यात "ऑपरेशन मुस्कान-१३" ही शोध मोहीम तसेच बेपत्ता महिलांबाबत विशेष शोध मोहीम राबविणेबाबत..**

राज्यात हरविलेल्या बालकांच्या व महिलांच्या संदर्भात "ऑपरेशन मुस्कान-१३" ही शोध मोहीम दिनांक ०१/१२/२०२४ ते दिनांक ३०/१२/२०२४ या कालावधीत राबविणेबाबत राज्यात निश्चित केले असुन, याचदरम्यान पुणे शहरामध्ये हरविलेल्या बेपत्ता बालके (१८ वर्षाखालील ) व महिलांचा (१८ वर्षावरील ) शोध घेण्यासाठी ही मोहिम राबविण्यात येत आहे,

सदर मोहिमेच्या अनुषंगाने प्राप्त निर्देशाप्रमाणे अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंध कक्ष,गुन्हे शाखा पुणे शहर येथे सर्व परिमंडळ मधील पोलीस स्टेशन निहाय टिम तयार केली असुन सदर टिम पुणे शहरातील सर्व पोलीस स्टेशनला भेटी देऊन सदर मोहिमेबाबत पोलीस स्टेशन कडील पोलीस अधिकारी व अमंलदार यांना समक्ष भेटुन सदर मोहिमेबाबत माहिती देणार आहेत.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक हे आपल्या पोलीस स्टेशन स्तरावर सदर मोहिमेकरीता एक अधिकारी व तिन पोलीस अमंलदार असे विशेष टिम तयार करुन त्यांचेकडुन ऑपरेशन मुस्कान -१३ शोध मोहिम दिनांक ०१/१२/२०२४ ते दिनांक ३०/१२/२०२४ या कालावधीमध्ये हरविलेल्या सर्व बालकांचा व १८ वर्षावरील महिलांचा प्रभाविपणे शोध घेण्यात येणार आहे.

तरी "ऑपरेशन मुस्कान-१३"प्रभाविपणे पार पाडण्यासाठी जनमानसात सदर मोहिमेचा प्रसार व्हावा व त्यायोगे जनसहभाग वाढावा तसेच जनसामान्यांना निदर्शनास आलेली बेवारस मुले व महिला यांचेबाबत संबधित पोलीस स्टेशनला जनसामान्यांनी माहिती देणेकरीता प्रसार माध्यमाव्दारे जनजागृती होणेबाबत.